# बेरोजगारी : समस्या व उपाय

**प्रा. ताराचंद गो. रामटेके**
निर्धन पाटील वाघाये कला व विज्ञान महाविद्यालय सौंदड
Email - tarachandramteke1202@gmail.com

---

**सारांश :**

माणुस हा एक समाजशिल प्राणी आहे त्यामुळे त्याला समाजामध्ये वावरतांना रूढी, परंपरा, नितीनियम याचे पालन करावे लागतात. हे करतांना त्याला अनेक कौटुबिंक जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात. त्या पार पाडण्यासाठी रोजगार आवश्यक ठरतो. किंबहुना रोजगारा अभावी व्यक्तीला उत्पन्न मिळत नाही परिणामी तो व्ययक्तीक, सामाजिक जिवन जगु शकत नाही. म्हणून बेरोजगारी दुर करून समाजातील तरूण पीढीतील नैराश्य दुर करून आर्थिक स्वास्थ टिकविण्यासाठी वास्तव रोजगार निती ही काळाची गरज आहे.

वाढती लोकसंख्या व जागतीकीकरणाच्या युगात बेरोजगारांच्या संध्याच्या परिस्थितीत शासनाने रिक्त पदे भरली नाहीत तर लोकसंख्ये प्रमाणे बेरोजगारीचा विस्फोट होण्यास अधिक वेळ लागणार नाही आणि ही स्थिती आली तर भ्रष्टाचार, गुन्हेगारीला थांबविणे कठीण होईल.

**सुचक शब्द :**

बेरोजगारी, मजूरी, सामाजीक लोकसंख्या, समस्या.

---

**प्रस्तावना :**

व्यक्ती आणि समाज परिवर्तनशिल आहे आणि त्यासाठी निर्माण होणारी परिस्थीतीही परीवर्तनशिल आहे. जसजशी परिस्थीती बदलते तसतसा मानवाच्या गरजा ही बदलत जातात. काळानुसार गरजा बदलत जातात आणि नवीन गरजा निर्माण होतात. नवनवीन गरजा निर्माण होऊन जुन्या गरजा अनावश्यक ठरतात. गरजानुसार समाजात रूढ असलेल्या प्रथा, परंपरा, जिवन, राहणीमान यामध्ये परिवर्तन घडून येते. जसजसा परिवर्तन घडून येतो, तसातसा मानवी मुल्यात बदल होतो. आणि हाच बदल समस्याना जन्म देतो.

स्वातंत्र्यानंतर समस्या नव्हत्या असे नाही. समस्या होत्या परंतु त्या समस्याची तीव्रता कमी होती. आज समस्यांचे प्रमाण एवढे वाढले की, व्यक्तीला या समस्यांनी ग्रासून टाकले आहे. समस्यांच्या जाळयांनी सर्वत्र कमी–धिक प्रमाणात पाय पसरले आहे. जसे, लोकसंख्या, दारिद्रय बेरोजगारी गून्हेगारी आंतकवाद इ. या सर्वापैकी आजाच्या विज्ञान युगात ज्वलंत समस्या म्हणजे बेरोजगारीची होय.

प्राचीन काळात बेरोजगारीची समस्या नव्हती असे नाही. समस्या होती. परंतू आज बेरोजगारीच्या समस्येने जे उग्र रूप धारण केले आहे तसे नव्हते कारण, कमी लोकसंख्या, कष्टाळू व्यक्ती, मर्यादीत गरजा, आणि विशेष म्हणजे तंत्रज्ञानाचा विकास पाहीजे त्या प्रमाणात झालेला नव्हता, परंतु आज पूर्वीसारखी परिस्थीती नाही. आजच्या कारखानी आणि यंत्रमानवी युगात अनेक समस्यापैकी बेरोजगारी हि एक प्रखर समस्या आहे. ही समस्या एका देशापुरती नाही तर जागतीक समस्या आहे. संपूर्ण समाजात बेरोजगारीच्या समस्चे जाळे पसरलेले दिसते. याच बेरोजगारीमुळे मानवी साधन शक्तीचा उपव्यय होतो. तसेच राष्ट्राचे उत्पन्न कमी होऊन समाज हा गरीब व मागासलेला राहतो. बेरोजगारीमुळे अर्थवेवस्थेच्या सुरक्षीततेला व स्थैर्याला धोका निर्माण

होतो.

**बेरोजगारीच सुरूवात :**

बेरोजगारी हा शब्द सर्वप्रथम १८७० मध्ये अमेरीकेत अदयास आला. या कालावधीत बेरोजगारीने मातीत स्वत:ची बीजे रोवण्यास सूरूवात केले परंतु खऱ्या अर्थाने १९ व्या शतकामध्ये बेरोजगारीच्या समस्येला सुरूवात झाली आणि आजपर्यंत ती वाढत गेली म्हणूनच आजच्या काळात बेरोजगारीच्या या दोन्ही संज्ञा एकाच अर्थाने वापरल्या जात असल्या तरी त्यामध्ये फरक आहे. जसे दिर्घकाळ आजारीपणा, काम करण्याची इच्छा नसणे, कोणतेही काम नसणे, ऐतखाऊपणा अशांना बेकार म्हणता येईल. परंतु काम करण्याची क्षमता व ईच्छा असूनही एखाद्या व्यक्तीला काम मिळत नसेल तर अशा व्यक्ती ''बेरोजगार'' म्हणजेच बेकारी ही ऐच्छीक असू शकते, परंतू बेरोजगारी ही समाजाने लादलेली असते.

**बेरोजगारीचा अर्थ :**

बेरोजगारीमध्ये साधरत: असे लोक येतात की, जे काम करण्यास समर्थ व तयार आहेत पण त्यांना काम मिळत नाही. मजुरांच्या मागणीपेक्षा पुरवठा जास्त झाल्यास बेरोजगारत वाढ होते. देशात उपलब्ध असलेल्या कामापेक्षा कामकरी व्यक्ती जास्त असल्यामुळे जर कोणाला कामापासून वंचीत रहावे लागत असेल तर त्या अवस्थेला बेरोजगारी असे म्हणरतात. कीन्स, या अर्थतज्ञांच्या मते, बेरोजगारी ही अर्थवेवस्थेतील मंदी व मागणीच्या कमतरतेमुळे अस्तीत्वात येते.

**बेरोजगारीची व्याख्या :**

कोणत्याही देशाची लोकसंख्या त्या देशाची संपत्ती असते तिचा योग्य उपयोग केला नाही तर ती एकप्रकारची देयता किंवा जबाबदारी बनते. वाढती लोकसंख्या व नैसर्गिक साधनाची मर्यादीत उपलब्धता यामुळे बेरोजगारीची समस्या निर्माण होते व ही समस्या दिवसे–दिवस रौद्र रूप धारण करते. असे असले तरी कोणत्या व्यक्तीला बेरोजगार म्हणावे ? या विषयी कुणाचेही एकमत नाही.

**१) पिगुच्या मते :**

''कोणत्याही माणसाला बेरोजगार तेव्हाच म्हणता येईल की, ज्यावेळी त्याला काम करण्याची इच्छा असून काम मिळत नसेल'', काम करण्याची ईच्छा, कामाचे तास, मजुरी व व्यक्तीची शारिरीक स्थिती यावर अवलंबून असते.

**२) डॉ. सक्सेना यांच्या मते :**

काम करण्याची इच्दा व काम करण्याची पात्रता असुनही प्रचलीत मजूरी दराला ज्यांना काम मिळत नाही अशा सर्व व्यक्तीना बेराजगार म्हणत येईल.

**संशोंधनाची उद्‌दीष्टये :**

१) संशोधन विषयातील समस्याचे विवरण करणे.

२) संशोधनातील समस्याचे उपाय योजना सुचविने

**बेरोजगारीचे प्रकार :**

अ) ऐच्छीक बेरोजगारी — मोसमी, तांत्रीक, तात्पुरती

ब) अनैच्छिक बेरोजगारी — अदृश्य, दृश्य, प्रच्छन्न अर्ध, औद्योगिक

**अ) ऐच्छिक बेरोजगारी :**

स्वत:च्या इच्छेमुळे काम किंवा रोजगार सोडून देणाऱ्या व्यक्तीला ऐच्छीक बेरोजगारी म्हणतात.

**ऐच्छीक बेरोजगारीची कारणे :–**

१) सामाजीक रूढी

२) सामाजिक प्रथा, परंपरा

३) आळशी श्रीमंत

४) आळशी गरीब

**ब) अनैच्छीक बेरोजगारी :**

प्रत्येक देशात असलेली बेरोजगारी ही प्रामुख्याने वस्तुनिष्ठ कारणांमुळे निर्माण होते. विशिष्ट वेळी समाजात उपलब्ध असलेला रोजगार शोधणाऱ्यांची संख्या जास्त असते तेव्हा अनैच्छीक बेरोजगारी असते.

**अनैच्छीक बेरोजगारीचे उपप्रकार :**

**१) मोसमी बेरोजगारी :**

काही उद्योगामध्ये मोसमानुसार उत्पादनाच्या प्रमाणात वाढ किंवा घट होते तेव्हा मोसमी बेरोजगारी निर्माण होते उदा. शेती क्षेत्र.

**२) तांत्रीक बेरोजगारी :**

बजारात काही वस्तुंची मागणी कमी – जास्त होते, एखाद्या वस्तुंची मागणी कमी झाली की, त्या वस्तुचे उत्पादन करणारे कामगार बेरोजगार होतात.

उदा. जुन्या यंत्राच्या जागी नवीन यंत्र लावल्यामुळे.

**३) तात्पुरती बेरोजगारी :**

शिक्षण पुर्ण झाल्यानंतर पुरेशा अनुभव नसल्यामुळे किंवा नोकरीच्या जागा शिल्लक नसल्यामुळे अनेकांना बेरोजगार रहावे लागते.

**अदृश्य बेरोजगारी :**

जेव्हा व्यक्तींना गरजेपोटी तिच्या कुवतीपेक्षा कमी प्रतीची, त्याची ईच्छा नसतांना नोकरी स्विकारावी लागते, परंतु त्याला बेरोजगार आहे असं म्हणता येत नाही. तेव्हा अशा बेरोजगारीला अदृश्य बेरोजगारी असं म्हणतात.

**दृश्य बेरोजगारी :**

रोजगार शोधणाऱ्या व्यक्तीला काही काळापर्यत कोणत्याही प्रकारचा रोजगार मिळत नाही अशा बेरोजगारीला दृश्य बेरोजगार म्हणतात. या बेरोजगारीचे निश्चित अनुमान करणे शक्य असते.

**प्रच्छन्न बेरोजगारी :**

श्रीमती जोन रॉबीन्सने सर्वप्रथम हि संकल्पना मांडली त्या म्हणतात ‘‘कमी उत्पादकता वाढत असेल तर त्या उद्योगात प्रच्छन्न बेरोजगारी अस्तीत्वात आहे असे समजावे.

**अर्ध– बेरोजगारी :**

जेव्हा पुर्णवेळ रोजगार नाही अथवा रोजगारीमध्ये कामगारांच्या पुर्ण क्षतेचा उपयोग होत नाही त्या विशिष्ठ अवस्थेत अर्ध – बेरोजगारी असते.

**औद्योगिक बेरोजगारी :**

मजुर वर्गाने केलेला संप किंवा मालकाद्वारे औद्यागिक संस्था/कारखाने या मधील टाळेबंदीच्या कारणामुळे किंवा मिल/कारखाना बंद पडल्यामुळे ही बेरोजगारी अस्तीत्वात येते.

**क्षेत्रानुसार बेरोजगारी :**

**१) ग्रामीण बेरोजगारी :**

ही बेरोजगारी शेती व्यवसायातून आढळून येते ग्रामीण भागात आजही ७० ते ८० टक्के लोकांना शेती व्यवसायातुन रोजगार मिळतो.

**२) शहरी बेरोजगारी :**

शहरामध्ये दिसून येणारी बेरोजगारी ही प्रामुख्याने ग्रामीण बेरोजगारी आहे कारण रोजगार मिळविण्यासाठी ग्रामीण भागातील तरूणांचे लोंच्या लोंढे शरामध्ये, उद्योगामध्ये स्थानातरींत होतात. मजुरांच्या होणाऱ्या वाढीच्यातुलनेत उद्योगांच्या संख्येत वाढ होतांना दिसून येत नाही.

**३) शिक्षितांची बेरोजगारी :**

सुशिक्षित बेरोजगारी ही दोषपुर्ण शिक्षण पध्दतीमुळे निर्माण झालेली आहे. आजची शिक्षण प्रणाली ही रोजगाराभिमुख नाही.

**बेरोजगारीच्या समस्यांची कारणे :**

**अ) वैयक्तीक कारण :**

कामाचा पुर्ण अनुभव नसणे पात्रता, कौशल्यांचा अभाव, शिक्षण, प्रशिक्षण झाले असून त्या व्यक्तीमध्ये फारशी गुणवत्ता नसणे, योग्य मार्गदर्शनाचा अभाव इ. वैयक्तीक कारण रोजगारीची संधी मिळण्याच्या मार्गात बाधक ठरतात.

**ब) आर्थिक कारण** :

अल्पबचत, भांडवलाचा अभाव मोठ्या प्रमाणावरील मध्यम व लघुउद्योग यांचा ऱ्हास किंवा बंद पडणे मंदी, आणि व्यापारातील मंदीचा फरका या आर्थिक कारणामुळे बेरोजगारी निर्माण होतो. ''किन्स हे अर्थशास्त्रज्ञ म्हणतात ''बचत करण्याच्या ईच्छेचा अभाव, हे बेरोजगारी निर्माण करण्याचं कारण होय.

**क) नैसर्गिक कारण :**

महापूर, दुष्काळ, वादळ, दंगे–धोपे, युध्द या सारख्या नैसर्गिक आणि आकस्मिक पणे घडून येणाऱ्या कारणांमुळेही बेरोजगारीची समस्या निर्माण होते.

**ड) सामाजिक कारणे :**

**१) श्रमिक संघ :**

श्रमिक संघ सतत मजुरी मध्ये वाढ करण्यासाठी कारखानदार किंवा मिल मालक यांना विवश करतात. मजुरीत वाढ किंवा त्या निर्माण हेणाऱ्या वस्तुच्या उत्पादन किंमतीत वाढ होते. आणि उत्पादकांना तोटा सहन करावा लागतो. म्हणुन मालक श्रमाऐवजी यंत्राचा जास्तीत जास्त वापर / प्रयोग करतात आणि श्रमिकांच्या संख्येत कपत करतात परिणामी बेरोजगारी वाढते.

**२) श्रमाच्या मागणी – पुरवठ्यान असंतुल :**

हे कारण परंपरावादी अर्थशास्त्रज्ञांनी प्रस्तुत केले आहे. कोणत्याही देशात कार्य करणाऱ्यांची संख्या निश्चीत होते व त्यानुसार श्रमाची मागणी केली जाते. अशावेळी श्रमाची मागणी कमी व काम करण्याच्या

इच्छुक व्यक्तीची संख्या अधिक असेल तर बेरोजगारीत वाढ होते.

**३) उपभोगापेक्षा बचत जास्त :**

किन्स म्हणतात राष्ट्री उत्पन्नाचा एक निश्चीत भाग उपभोगावर खर्च केला पाहिजे व शेष भागाची बचत केली पाहिजे परंतु उपभोगावर करण्यात येणाऱ्या व्ययाची (खर्चाची) मात्रा कमी आणि बचत राशीच्या मात्रेत वाढ होते तेव्हा बेरोजगारी वाढते. कारण उपभोगावर खर्च कमी केल्यामुळे उपभोग्य वस्तुंची मागणी कमी होते. परिणामी त वस्तुचे उत्पादन करण्याऱ्या संस्था/कारखाने बंद पडतात.

**४) लोकसंख्या वाढ :**

माल्थसच्या मताप्रमाणे लोकसंख्येच्या वाढीमुळे बेरोजगारी वाढते. ज प्रमाणात लोकसंख्येत वाढ होतांना दिसते. त्या प्रामाणात रोजगारीच्या क्षेत्रात वाढ होतांना दिसत नाही.

**५) मंदीचा काळ :**

मंदीच्या काळामध्ये वस्तुंच्या मागणी नसते. त्यामुळे वस्तुंच्या किंमती खुप खाली येतात. त्यामुळे उत्पादकांना मोठ्या प्रमाणावर तोटयाला तोंड द्यावे लागतो या तोट्यापासुन बचाव करण्यासाठी उत्पादन कार्य बंद करावे लागते. परिणामी मजुर बेरोजगार होतात.

**६) विवेकीकरण :**

विवेकी करणामुळे बेरोजगारी वाढते विवेकीकरणामध्ये कुश कामगार, किंवा चांगल्या मशिन आणि नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर केला जातो त्यामुळे श्रमाची बचत होते. आणि मजुराना कामावरून काढून बेरोजगारी वाढते.

**बेरोजगारीचे परिणाम**

**१) वैयक्तीक विघटन :**

पात्रता व इच्छा असुनही नोकरी मिळाली नाही तर त्या व्यक्तीवर विपरीत परिणाम होतो यामध्ये तणाव, चिडचिडेपणा, न्युनगंड, नैराश्य वाढत गेल्यामुळे त्याचे कुंटूबातील व्यक्तीशीं आणि सामाजीक संबंधामध्ये बिघाड निर्माण होऊन बेरोजगारीला कंटाळून आत्महत्या सारख्या घटना घटतात.

**२) सामाजिक समस्या :**

बेरोजगारीमुळे जुगार येळणे, भिक मागणे, यासारख्या सामाजिक समस्या निर्माण होतात. समाजातील सर्वाकडून निराशा, असफलता, यामुळे तो व्यक्ती उदासीन होतो व शेवटी दारूच्या नशेत डुबून सर्व विसरण्याचा प्रयत्न करतो. परंतू त्यामुळे त्याच्या कुंटूबात अनेक समस्या जन्म घेतात.

**३) कौटूबिक विघटन :**

बेरोजगारी सारख्या अवस्थेत घराबाहेर पडतात. अशावेळी मुला—बाळांचे योगय प्रमाणात संगोपण होत नाही.

**४) दारिद्रयाच्या प्रमाणात वाढ :**

बेरोजगारीमुळे व्यक्ती स्वत:ची व कुटुंबाची मुलभुत गरजी पुर्ण करू शकत नाही. त्यामुळे त्याच्या राहणीमानावर परिणाम होऊन त्याच्या आरोग्यावर परिणाम होतो. त्यामुळे त्याच्या कार्यकुसलतेत घट होते. परिणामी रोजगारी करण्यास असमर्थ ठरतो व दादिद्रयात वाढ होतो.

**बेरोजगारी कमी करण्याचे उपाय**

१) लघु व कुटीर उद्योगांचा विकास करणे.

२) लोकसंख्या कमी करण्यासाठी प्रयत्न करणे.

३) शासनाने बेरोजगारी कमी करण्यासाठी अधिक प्रयत्न करणे.

४) रोजगार केंद्राना प्रभावशाली बनविने.

५) शिक्षणाचा दर्जा सुधारणे

६) बेरोजगारी विमा देणे.

७) रिक्त असलेली शासकीय पदे तात्काळ भरणे.

८) नोकरीसाठी असलेल्या अटी शिथील करणे.

९) औद्योगिकीकरण ग्रामीण भागात करणे.

**संदर्भ ग्रंथ सुची :**


- आगलावे प्रदीप (१९९६) ''सामाजिक समस्या'' विद्या प्रकाशन नागपूर
- आगलावे पदीप (२००८) ''भारतीय समाज संरचना आणि समस्या, साईनाथ प्रकाशन नागपूर
- दांडगे (सप्टे, २००१) भारतीय बेरोजगारीचे शिल्पकार कोण ? योजना
- डॉ. प्रान्जु हिरेखान (ऑगस्ट २०१५) ''बेरोजगारी सामाजिक समस्या'' पिंपळापुरे प्रकाशन नागपूर
- डॉ. मृणालीनी फडणवीस, डॉ. प्राची देशपांडे (२००२) श्रम अर्थशास्त्र पिंपळापुरे प्रकाशन नागपूर.